सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**
**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक- एसआरव्ही २०२५/ प्र. क्र. ६८/सेवा-३ (का.१२), दि.१०/०२/२०२६

**विषय**:- तात्पुरत्या (कंत्राटी) स्वरुपात नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचा-यांच्या सेवा. नियमित करण्याच्या प्रस्तावांबाबत अभ्यास करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याकरिता अभ्यास गट गठित करण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही २०२५/ प्र. क्र. ६८/सेवा-३ (का.१२), दि.१०/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१०१७३३३४४१०७ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 11-02-2026 23:07:39

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथक फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण,माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते २०
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

तात्पुरत्या (कंत्राटी) स्वरुपात नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याच्या प्रस्तावांबाबत अभ्यास करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याकरिता अभ्यास गट गठित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक एसआरव्ही-२०२५/प्र.क्र.६८/सेवा-३ (का.१२).**
५४८, मंत्रालय (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई. पिन ४०००३२.
दिनांक : १० फेब्रुवारी २०२६.

**संदर्भ** :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसआरव्ही-२००५/प्र.क्र.४७/०५/१२, दि.२५.०८.२००५.

**प्रस्तावना.**

अपील (दिवाणी) क्र.७७४४/१९९७, डॉ. (श्रीम.) चंचल गोयल वि. राजस्थान राज्य आणि अपील (दिवाणी) क्र.१४१३/२००३, ए. उमराणी वि. निबंधक सहकारी संस्था व इतर या प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने अनुक्रमे दि.१८.०२.२००३ व दि. २८.०७.२००४ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयांना अनुलक्षून, संदर्भाधीन शासन परिपत्रकाद्वारे पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या-

> "सर्व मंत्रालयीन विभाग, विभाग प्रमुख आणि कार्यालय प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, मा. सर्वोच्च न्यायालयाचे उपरोक्त आदेश पाहता सर्व पदावरील नियुक्त्या विहित मार्गाने/माध्यमामार्फत करण्याची दक्षता घ्यावी. अत्यंत तातडीची गरज म्हणून तात्पुरत्या/अस्थायी नियुक्त्या कराव्या लागल्या तर त्या विहित वेळेत संपुष्टात आणण्याची दक्षता घ्यावी तसेच अशा कर्मचा-यांनी त्यांना नियमित सामावून घेण्याची मागणी केल्यास ती मान्य करता येणार नसल्याचे त्यांना स्पष्टपणे सांगण्यात यावे. तसेच यासंदर्भात न्यायालयात प्रकरण दाखल झाल्यास मा. सर्वोच्च न्यायालयाच्या वरील न्यायनिर्णयांचा संदर्भ देऊन युक्तिवाद करण्याच्या सूचना सरकारी वकीलांना देण्यात याव्यात."

२. असे असतानाही, तात्पुरत्या (कंत्राटी) कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत प्रस्तावांवर काही प्रशासकीय विभागांकडून कार्यवाही करण्यात आली आहे. म्हणून, संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये याबाबत उद्भवलेली प्रकरणे व कायदेशीर बाजू लक्षात घेऊन अशा प्रस्तावांवर करावयाच्या कार्यवाही संदर्भात अभ्यास करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याकरिता एक अभ्यास गट गठित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय.**

शासकीय व निमशासकीय आस्थापनांवरील तात्पुरत्या स्वरुपात नियुक्त असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्याबाबत संबंधित प्रशासकीय विभागांमध्ये उद्भवलेली प्रकरणे आणि कायदेशीर बाजू लक्षात घेऊन अशा प्रस्तावांसंदर्भात अभ्यास करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल शासनास सादर करण्याकरिता, याद्वारे, पुढीलप्रमाणे अभ्यास गट गठित करण्यात येत आहे:-

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | मा.मुख्य सचिव | ... | अध्यक्ष. |
| (२) | अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग | ... | सदस्य. |
| (३) | अपर मुख्य सचिव (सेवा), सा. प्र. विभाग | ... | सदस्य. |
| (४) | प्रधान सचिव/सचिव, नियोजन विभाग | ... | सदस्य. |
| (५) | प्रधान सचिव व विधि परामर्शी, विधि व न्याय विभाग | ... | सदस्य |

२. सदर अभ्यास गटाच्या बैठकीस आवश्यकतेनुसार तज्ञ अथवा अन्य अधिकाऱ्यांना निमंत्रित सदस्य म्हणून अध्यक्ष आमंत्रित करु शकतील.

३. उक्त समिती समोर शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, ग्राम विकास विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग व अशा इतर संबंधित विभागाच्या सचिवांनी त्यांच्या विभागाशी संबंधित योजनेखालील तात्पुरत्या (कंत्राटी) नियुक्त्या नियमित करण्याबाबत उद्भवलेल्या प्रकरणाची वस्तुस्थिती, वित्तीय भार, कायदेशीर बाबी तसेच भारत सरकार व इतर राज्यांतील अशा योजनेबाबत कार्यपद्धती, इत्यादी माहितीसह आपले अभिप्राय सादर करावेत.

४. त्या अनुषंगाने अभ्यास करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल उक्त अभ्यासगट शासनास सादर करील.

५. हा शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२१०१७३३३४४१०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

LEENA ASHISH SANKHE

Digitally signed by LEENA ASHISH SANKHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GAD, 2.5.4.20=522242E2259DBF8FC1AED336674EBF6138607B16AACBBED00301A9E43C62F6C7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=783CA3332598C7E1C28393EA543FA05D9FB77F36A848F4738D12288E105699F4, cn=LEENA ASHISH SANKHE
Date: 2026.02.10 17:34:53 +05'30'

( लिना संखे )
**शासनाच्या उपसचिव.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, लोक भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री, नगरविकास, गृहनिर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री, राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ, यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

५) सर्व मा. मंत्री/मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
७) मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मुख्य सचिव कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
८) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

**प्रत:-** निवड नस्ती, सेवा-३.